# जगायचं असेल तर निसर्गाला जगवा - प्राचार्य अरविंद चौधरी

(24.09.2019) दि. २४ सप्टेंबर २०१९ रोजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रा. से. यो स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील परिसर प्लास्टिक मुक्त व स्वच्छता करून रा.से.यो. स्थापना दिवस साजरा केला. परिसर स्वच्छतेनंतर महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांनी आपल्याला जगायचं असेल तर निसर्गाला जगवा असे आव्हान स्वयंसेवकांना केले व निसर्ग जगवण्यासाठी प्लास्टिक मुक्त राष्ट्र, झाडे लावा व झाडे जगवा तसेच स्वच्छतेविषयी स्वयंसेवकांचे कर्तव्य व या विविध विषयांवर जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. चेतनकुमार शर्मा यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या युवा हा राष्ट्रहितासाठी किती महत्वाची भूमिका पार पाडू शकतो या बद्दल कार्यक्रमाच्या प्रस्ताविकेत नमूद केले.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. देवसिंग पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी श्रीमती कांचन दमाडे उपस्थित होते.सूत्रसंचालन सुधीर काटकर व हरीश बाभुळकर याने आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पवन, पुरुषोत्तम, मनोज व सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.






